## <u>दिवाणी चौकशी अर्ज क्र.४४/२०२५</u>

## <u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>

## (**CNR NO.MHNS160015782025**)

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार क्र. १ ते ४ व (मयत) सिंधूबाई रतन दखने त्यांची आई व मयताचे वारस अर्जदार क्र. ५ ते ८ यांनी विठाबाई दत्तु ठाकरे यांचे ते कायदेशीर वारस असून त्यानुसार त्यांना वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सादर केला आहे.

२. अर्जदार यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार हे हिंदू–मराठा धर्माचे असून अर्जदार हे वेगवेगळ्या ठिकाणचे रहिवाशी आहे. अर्जदार क्र. १ ते ४ व मयत सिंधूबाई रतन दखने या मयत विठाबाई दत्तु ठाकरे यांच्या ५ मुली असून त्या एकमेकांच्या सख्ख्या बहिणी आहेत व मयत सिंधुबाई रतन दखने या दि.१४.१२.२०२४ रोजी मौजे निमोण, ता. चांदवड, जि. नाशिक येथे मयत झालेल्या असून व त्यांना सख्खा भाऊ नाही व अर्जदार क्र. ५ ते ८ हे मयत सिंधुबाई रतन दखने हिचे वारस आहेत व हे सर्व रक्ताचे नात्यातील आहे.

३. अर्जदार क्र. १ ते ४ व कै. सिंधुबाई रतन दखने यांची आई व अर्जदार क्र. ५ ते ८ यांची आजी नामे मयत विठाबाई दत्तु ठाकरे ही दि.११.०५.२०२३ रोजी मौजे काजीसांगवी, ता. चांदवड, जि. नाशिक येथे मयत झालेली असून तिच्या नावे काजीसांगवी, ता. चांदवड जि. नाशिक येथे मिळकती आहेत. अर्जदार क्र. १ ते ८ हेच मयत विठाबाई ठाकरेचे कायदेशीर वारस असल्यामुळे अर्जदार क्र. १ ते ८ यांनी त्यांच्या नावाने वारस नोंद होण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय काजीसांगवी व राज्य उत्पादन शुल्क विभाग कळवण, नाशिक यांच्याकडे अर्ज दाखल केला असता त्यांनी मयत विठाबाई दत्तु ठाकरे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची मागणी अर्जदार यांच्याकडे केली. त्यामुळे मयत विठाबाई दत्तु ठाकरे यांना अर्जदार

यांच्याशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नसून त्यांचे एकमेव कायदेशीर वारस असल्याचे दाखवण्यासाठी वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. अर्जदार हे मयत विठाबाई दत्तु ठाकरेचे कायदेशीर वारस आहे असा वारस दाखला मिळण्यासाठी अन्य कोणत्याही न्यायालयात या पुर्वी अर्ज दाखल केलेला नाही व असा अर्ज प्रथमताच या न्यायालयात दाखल केलेला आहे. असे अर्जदाराने अर्जामध्ये व तिच्या शपथपत्रामध्ये कथन केले आहे.

५. सदर अर्जात अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या लाभात वारसा प्रमाणपत्र देण्यासाठी कुणाची हरकत आहे का हे पाहण्यासाठी जाहीर नोटीस काढून हरकत मागविण्यात आली. सदरची जाहिर नोटीस ही दिनांक ३१.१२.२०२५ रोजीच्या दैनिक 'आपलं महानगर' मध्ये देखील प्रसिध्द करून हरकत मागविण्यात आली. त्याची प्रत अर्जदाराने प्रस्तुतकामी कामी निशाणी ११ कडे दाखल केलेली आहे. परंतु, विहीत मुदतीत सदर प्रकरणात कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे, सदर प्रकरण विना हरकत राहिले आहे.

६. मयत सिंधूबाई रतन दखने यांचे वारस अर्जदार क्र. ७ विजय रतन दखने यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १३ कडे स्वतःसाठी व अर्जदार क्र. १ ते ६ व ८ साठी दाखल केले. त्यांनी त्यांच्या सरतपासात मुळ अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केल्या आहेत. अर्जदाराने कागदोपत्री पुराव्यामध्ये दैनिक 'आपलं महानगर' मध्ये प्रसिध्द झालेली जाहिर नोटीस नि.क्र.११, विठाबाई दत्तू ठाकरे, सिंधूबाई रतन ठाकरे यांचे मृत्यु प्रमाणपत्र, विठाबाई दत्तू ठाकरे यांची काजीसांगवी ता. चांदवड, येथील घर मिळकत क्र. १५९ व १६०, विठाबाई दत्तू ठाकरे यांची

काजीसांगवी ता. चांदवड, गट नं. ४७१/१ ची फेरफार नोंद, विठाबाई दत्तू ठाकरे यांची काजीसांगवी ता. चांदवड, येथील गट नं. ४८८/१ ची फेरफार नोंद, विठाबाई दत्तू ठाकरे यांचे नाव कमी करणेकामी काजीसांगवी ता. चांदवड येथील फेरफार क्र. १९५८, विठाबाई दत्तू ठाकरे यांचे नावे असलेले देशी दारु मद्यविक्री परवाना नं. ४८/१९७४–७५ झेरॉक्स प्रत, तसेच अर्जदार क्र. १ ते ४ व मयत सिंधूबाई रतन दखने यांचे वारस अर्जदार क्र. ६ ते ८ यांच्या आधारकार्डच्या साक्षांकित प्रती हे सर्व कागदपत्र निशाणी ३ सोबत दाखल केलेले आहेत. सदर अर्जात हरकतदार कोणीही नसल्याने अर्जदाराचा पुरावा व प्रस्तुत दस्तऐवज आक्षेपाविना राहिले आहेत.

७. सकृतदर्शनी पुराव्याच्या आधारे अर्जदार क्र. १ ते ४ तसेच मयत सिंधूबाई रतन दखने यांचे वारस क्र. ५ ते ८ हे मयत विठाबाई दत्तू ठाकरे यांचे वारस आहेत इतपत पुरावा अभिलेखावर दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ८ हे मयत विठाबाई दत्तू ठाकरे यांचे वारस असल्याचे अभिपटलावर निदर्शनास येते. त्यामुळे, दाखल लेखी व कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार क्र. १ ते ८ यांना वारस प्रमाणपत्र देणे न्यायसंगत वाटते. सबब, वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

:: **आदेश** ::

१. अर्जदार क्र. १ कौशाबाई रुंझाजी सैद, रा. खैरगव्हाण, ता. येवला, अर्जदार क्र. २ इंदूबाई बाळासाहेब वाघ, रा. ११/१२, गुरुकृपा अपार्टमेंट, इंद्रायणी कॉलनी, चांदवड, ता. चांदवड, अर्जदार क्र. ३ राजूबाई श्रीराम पुरकर, रा. धोंडगव्हाण, ता. चांदवड, अर्जदार क्र. ४ कल्पना उर्फ सुरेखा वसंतराव ठोंबरे, रा. ४६२/२९ गुरुनानक पेट्रोल पंपसमोर, आडगाव शिवार, अर्जदार क्र. ५ अनिता किरण जाधव, रा. रो–हाऊस नं. ७, ओम साई रो–हाऊस, विशाल पार्क,

कामटवाडे नाशिक, अर्जदार क्र. ६ योगेश रतन दखने, अर्जदार क्र. ७ विजय रतन दखने, अर्जदार क्र. ८ हनुमान रतन दखने, अर्जदार क्र. ६ ते ८ रा. निमोण, ता. चांदवड, जि. नाशिक यांचा वारस दाखल मिळणेचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ ते ४ व मयत सिंधूबाई रतन दखने यांचे वारस अर्जदार क्र.५ ते ८ हे मयत विठाबाई दत्तू ठाकरे यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे, त्यांना आवश्यक ते न्यायालयीन शुल्क अदा केल्या नंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. सदरचा आदेश खुल्या न्यायालयात देण्यात आला व त्यानंतर सदरचे प्रकरण बंद करण्यात आले.

SUNGARE VRUSHALI DINANATH

Digitally signed by SUNGARE VRUSHALI DINANATH
Date: 2026.03.30 11:58:11 +0530

दिनांक : ३०.०३.२०२६

ठिकाण : चांदवड.

(श्रीमती.वृषाली दी. सुंगारे)
सह दिवाणी न्यायदंडाधिकारी,
क.स्तर, चांदवड.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :– | ***एस. आर. हटकर,***<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नाव | :– | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग क.स्तर, चांदवड. |
| न्यायनिर्णयाची तारीख | :– | ३०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :– | ३०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | :– | ३०/०३/२०२६ |